# THE BOMBAY PUBLIC AUTHORITIES SEALS ACT, 1883.

## (Bombay V of 1883.)

## मुंबई सार्वजनिक प्राधिकारी शिक्के अधिनियम, १८८३.

अनुक्रमणिका.


प्रस्तावना.

कलमें.

| | | पान. |
|---|---|---|
| १. | लघु संज्ञा ... ... ... ... ... ... ... | ५२३ |
| २. | सन १८७० चा मुंबई अधिनियम २ रद्द करणें ... ... ... ... | ५२३ |
| ३. | विवक्षित सार्वजनिक प्राधिकाऱ्यांचे शिक्के विहित करण्याचा राज्य सरकारचा अधिकार. | ५२३ |
| ४. | निकटपूर्वीच्या कलमांअन्वयेंच्या अधिसूचना ज्या तारखेस अंमलांत येतील ती तारीख. | ५२३ |

# सन १८८३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५.

(मुंबई सार्वजनिक प्राधिकारी शिक्के अधिनियम, १८८३.)

[५ नोव्हेंबर, १८८३]

ह्या अधिनियम, सन १८९५ चा मुंबई अधिनियम १६ याअन्वयें अंशतः रद्द करण्यांत आला व त्यांत भारतीय विधी अनुकूलन परिषद आदेशान्वयें अनुकूलन व रूपभेद करण्यांत आले आहेत.

## सेशन न्यायाधीश, फौजदारी न्यायाधीश आणि इतर सार्वजनिक प्राधिकारी यांचे सरकारी शिक्के विहित करण्याचा सरकारला अधिकार देण्याबाबत अधिनियम

ज्याअर्थी, सार्वजनिक प्राधिकाऱ्यांचे कोणते सरकारी शिक्के असतील व त्यांनीं कोणत्या शिक्क्याचा उपयोग करावा हें विहित करण्याचा सरकारला अधिकार देणें इष्ट आहे ; त्याअर्थी पुढील प्रमाणें अधिनियम करण्यांत आला आहे :—

१. ह्या अधिनियमास मुंबई सार्वजनिक प्राधिकारी शिक्के अधिनियम, १८८३ असें म्हणावें. लघु संज्ञा.

२. सन १८७० चा मुंबई अधिनियम २ याअन्वयें रद्द करण्यांत आला आहे. त्या त्यावेळीं अंमलांत असलेली उक्त अधिनियमाअन्वयें काढलेली व आतां अंमलांत असलेली प्रत्येक अधिसूचना ही ह्या अधिनियमाअन्वयें काढण्यांत आली आहे असें समजण्यांत आले पाहिजे. सन १८७० चा मुंबई अधिनियम, २ रद्द करणें.

३. राज्य सरकारास, वेळोवेळीं राजपत्रांत अधिसूचना प्रसिद्ध करून, पुढीलपैकीं प्रत्येक सार्वजनिक प्राधिकाऱ्याचे कोणते सरकारी शिक्के असावे व त्यानें कोणत्या शिक्क्यांचा उपयोग करावा हें विहित करण्याचा अधिकार आहे :— विवक्षित सार्वजनिक प्राधिकाऱ्यांचे शिक्के विहित करण्याचा राज्य सरकारचा अधिकार.

(१) सेशन न्यायाधीश, अपर व संयुक्त सेशन न्यायाधीश आणि साहाय्यक न्यायाधीश ;

(२) प्रेसिडेन्सी फौजदारी न्यायाधीश ;

(३) इतर कोणताहि फौजदारी न्यायाधीश ;

(४) ज्याचा सरकारी शिक्का विधीअन्वयें विहित करण्यांत आला नाहीं व इतर कोणत्याहि प्राधिकाऱ्यांस तो विहित करण्याचा विधीनुसार अधिकार नाहीं असा इतर कोणताहि न्यायिक अधिकारी किंवा सार्वजनिक प्राधिकारी.

राज्य सरकारास, वेळोवेळीं, अशा प्रत्येक अधिसूचनेंत, तशाच अधिसूचनेद्वारें, सुधारणा करण्याचा किंवा ती रद्द करण्याचा अधिकार आहे.

४. निकटपूर्वीच्या कलमाअन्वयें रद्द करण्यांत आलेली प्रत्येक अधिसूचना ही, राज्य सरकार तीमध्यें ह्याबाबत ठरवील अशा तारखेस अंमलात येईल. निकटपूर्वीच्या कलमाअन्वयेंच्या अधिसूचना अंमलांत येतील ती तारीख.